'Sangola Taluka Shetkari Shikshan Prasarak Mandal Sangola's

# VIDNYAN MAHAVIDYALAYA SANGOLA

(Arts & Science, E.C.S. & B.C.A.)
Tal. Sangola Dist. Solapur Pin. 413 307 (Maharashtra)
(Affiliated to P. A. H. Solapur University)

☎ Off. (02187) 220508
Mob. No. 9421045987
Email : vidnyanms@yahoo.co.in
Website : www.vmssangola.org

Acting Principal : Dr. R. A. Fule
M.A., Ph.D.

Third Cycle Accredited by NAAC
with 'B' Grade (CGPA of 2.24)

Ref. No. Date : / /20

## NSS SPECIAL CAMP REPORT -2018-19

A seven-day camp was organized by the National Service Scheme Committee, Vidnyan Mahavidyalaya College, in collaboration with Solapur University, at village Waki from 21st January 2019 to 27th January 2019. On 21st January 2019, a special labor camp was inaugurated in the afternoon. Honorable Shri Sanjay Patil Tehsildar Sangola was present as the chief guest for this program and guided the students. On the first day, the campers cleaned the office premises and the stage in front of the Gram Panchayat office. On the second day, on 22nd January 2019, from 5 to 7 in the morning, Mr. Ananda Rao Masal, the principal of Sri Gurudatta Vidyalaya, Waki, tried to inculcate interest in exercise among the campers by conducting exercises and yoga. Between 8:30 and 12:30 in the morning, the volunteers cleaned the temples of the village such as Maruti Mandir, Samaj Mandir, Mayakka Devi Temple and the main roads of the village. Professor Sambhajirao Shinde, Head of the Department of Economics, gave a detailed guidance in the meeting. At six o'clock in the evening, Mr. Nandkumar More and Mr. Pravah Yadav tried to create public awareness by guiding the villagers and volunteers through entertainment on the topic of gender equality. On the third day of the camp, on the morning of 23rd January 2019, the volunteers did Shramdan to clean the premises of the dargya and the post office premises and removed the thorns, and also collected the awkward stones and kept them tidy. Dr. Raghunath Phule, Head of Geography Department, tried to awaken all the campers by example on the need of time for tree conservation. In the evening session, a lecture was organized by Professor RS Suryavanshi on the topic of elimination of superstitions. The school premises were cleaned, the trees were stoned, thorn bushes were removed, and the health center premises were cleaned and the bushes were cleaned from the primary school premises. On the same day, at three o'clock in the afternoon, Deepak khatkale, a teacher from New English School, spoke about the abuse of addiction to the students and villagers on the subject of addiction and today's youth. Dattatray Panchal guided the subject On the fifth day i.e. 25th January 2019, forty pits were dug to clean the premises of the Datta temple and plant trees and preparations were made for the construction of the Bhandara.

**Dr. S.S. Dhasade**
Coordinator, IQAC
Vidnyan Mahavidyalaya, Sangola
Tal. Sangola Dist. Solapur

**Acting Principal**
Vidnyan Mahavidyalaya, Sangola
Tal. Sangola Dist. Solapur

**Ref. No.** **Date : / /20**

Camp students guided the villagers at six o'clock in the evening under the theme of storytelling and poet meeting, poet Abasaheb Shejal and poet Vishal Kate tried to enlighten the society through social as well as rebellious and love poems etc. Republic day was celebrated in Gurudatta Vidyalaya and a dam was built on the stream in the Gavthan area of the village. In the afternoon session, Advocate Rajeshwari Kedar gave guidance on Right to Education Act awareness and cyber crime and a Haldi Kunkva program was organized for the women of the village. The trees were planted in the pits dug for planting trees in the temple premises. At 11:30 in the morning, the closing ceremony of the special labor camp was organized and concluded with enthusiasm.

**Documents are attached as below**

**Dr. S.S. Dhasade**
Coordinator, IQAC
Vidnyan Mahavidyalaya, Sangola
Tal. Sangola Dist. Solapur

**Acting Principal**
Vidnyan Mahavidyalaya, Sangola
Tal. Sangola Dist. Solapur

"सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, सांगोला" संचलित

# विज्ञान महाविद्यालय सांगोला

(कला, विज्ञान, इ.सी.एस. व बी.सी.ए.)
ता. सांगोला, जि. सोलापूर, पिन. ४१३ ३०७ (महाराष्ट्र)
(सोलापूर विद्यापीठाशी संलग्नीत)

प्राचार्य : डॉ. एस्.बी. जुंदळे
एम्.एस्सी.पीएच.डी.,डी.एच.ई.

ऑ. : (०२१८७) २२०५०८
नि. : (०२१८७) २२११५१
फॅक्स नं. (०२१८७) २२२३०६
e-mail : vidnyanms@yahoo.co.in
Website : www.vmssangola.org

(Re-Accredited by NAAC with 'B' Grade (CGPA of 2.24)

जावक क्र. ९३/२०१८-१९ दिनांक : १३/३/२०१९

प्रति,

मा. संचालक,
राष्ट्रीय सेवा योजना,
सोलापूर विद्यापीठ,
सोलापूर

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील राष्ट्रीय सेवा योजनेचा विशेष श्रमसंस्कार शिबीर अहवाल सादर करीत असलेबाबत ...

संदर्भ :- आपलेकडील जा.क्र. सोविसो / रा.से.यो. विभाग / २०१८-१९/१०७९७ दि. १८.१२.२०१८ चे पत्र

महोदय,

वरील संदर्भीय पत्राला अनुसरुन आमचे महाविदयालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील विशेष श्रमसंस्कार शिबीर मौजे - वाकी ( घेरडी ) , ता. सांगोला, जि. सोलापूर येथे दि. २१.०१.२०१९ ते २७.०१.२०१९ या कालावधीत नियोजित कार्यक्रमाप्रमाणे संपन्न झाले. त्याचा अहवाल, फोटो व दत्तक गावाची माहिती फॉर्म सोबत पाठवित आहोत. तरी स्विकार होऊन पुढील कार्यवाही करावी, ही विनंती आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

प्राचार्य
विज्ञान महाविद्यालय सांगोला
ता. सांगोला, जि. सोलापूर

<u>सोबत</u> :-

१. २०१८-१९ चा विशेष श्रमसंस्कार शिबीर दत्तक गांव माहिती फॉर्म
२. अहवाल
३. कार्यक्रमांचे निवडक फोटो
४. स्वयंसेवकांचे शिबीर कालावधीतील हजेरीपत्रक

# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## राष्ट्रीय सेवा योजना

सन २०१८-१९ विशेष शिबीर दत्तक गाव माहिती फॉर्म

| | |
|---|---|
| १. | महाविद्यालयाचे नांव : विज्ञान महाविद्यालय सांगोला जि. सोलापूर |
| २. | रासेयो कार्यक्रम अधिकारी नांव: प्रा. अशोक मनोहर कांबळे मो: 9673922572 |
| ३. | विशेष शिबीराचे ठिकाण: वाकी (बेरडी) तालुका सांगोला जिल्हा सोलापूर |
| ४. | विशेष शिबिर दिनांक : 29/01/2019 ते 26/01/2019 पर्यंत |
| ५. | महाविद्यालयापासून शिबिर ठिकाणाचे अंतर: 96 कि.मी |
| ६. | एकुण लोकसंख्या 2489 पैकी स्त्रीसंख्या 1238 पुरुष संख्या 1250 |
| ७. | दत्तक गावाचे एकुण क्षेत्रफळ : 10.20 चौ.कि.मी पैकी शेती लागवडीखालील क्षेत्र 652.60 |
| ८. | दत्तक गावास पाणीपुरवठा होणारा स्त्रोत : नळ पाणीपुरवठा एकुण पाणीसाठा<br>नळ असल्यास एकुण संख्या 265 हातपंप संख्या 12 |
| ९. | दत्तक गावातील एकूण वृक्षांची संख्या (अंदाजे): 3048 |
| १०. | दत्तक गावांतील शैक्षणिक संस्थांची माहिती :<br>एकुण 06 प्राथ.शाळा 05 माध्यामिक<br>शाळा 01 महाविद्यालये 00 |
| ११. | दत्तक गावातील एकूण युवा लोकसंख्येपैकी साक्षरांची संख्या (महिला व पुरुष %): 60% |
| १२. | दत्तक गावांतील ऐतिहासिक व धार्मिक स्थळांची माहिती (स्थापनावर्ष) :<br>1) हनुमान मंदिर<br>2) मा. साहेब दर्गा<br>3) दत्त मंदिर |
| १३. | दत्तक गावातील जास्तीत जास्त लोकसंख्येच्या उपजीविकेचे साधन शेती |
| १४. | शिबिर काळात झालेल्या प्रत्यक्ष कामाची थोडक्यात माहिती :<br>गावातील सर्व मंदीर परिसर व मुख्य रस्ते स्वच्छता, वृक्षारोपणासाठी खड्डे, वाहणाऱ्या ओढ्यावर वनराई बंधारा. |
| १५. | शिबीर काळात केलेल्या नाविण्यपूर्ण उपक्रमांची माहिती:<br>गावकऱ्यासाठी जलव्यवस्थापन शाश्वत विकास, अंधश्रध्दा निर्मुलन शिक्षण हक्क कायदा सायबर क्राईम या विषयांवर व्याख्याने |
| १६. | दत्तक गावांतील रुग्णालये 01 अनाथआश्रम 0 दत्तक गावाला मिळालेला पुरस्कार व वर्ष<br>1) निर्मलग्राम 2) तंटामुक्त 3) पर्यावरण संतुलित |

| | |
|---|---|
| कार्यक्रम अधिकारी<br>राष्ट्रीय सेवा योजना<br>विज्ञान महाविद्यालय, सांगोला<br>सही<br>रासेयो कार्यक्रम अधिकारी | प्राचार्य<br>विज्ञान महाविद्यालय सांगोला<br>ता. सांगोला, जि. सोलापूर<br>सही<br>प्राचार्य |
| सही<br>रासेयो जिल्हा समन्वयक | सही<br>रासेयो संचालक |

# सोलापूर विदयापीठ, सोलापूर

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

रासेयो सात दिवसीय निवासी विशेष श्रमसंस्कार शिबीरामध्ये स्वयंसेवक / स्वयंसेविका यांच्या श्रमदानातून केलेल्या कामाचा / उपक्रमांचा अहवाल

शिबीर स्थळ / गांवाचे नांव - वाकी ( घेरडी ), ता. सांगोला, जि. सोलापूर

सहभागी महाविदयालयाचे नांव :- विज्ञान महाविदयालय, सांगोला, जि. सोलापूर

सहभाग तपशिल - मुले - ५४, मुली - ३७ रासेयो कार्यक्रम अधिकारी महिला - ०२, पुरुष - ०४

सहभागी रासेयो कार्यक्रम अधिकारी यांचे नांव - १ ) प्रा. अशोक मनोहर कांबळे

२) प्रा.डॉ. काकासाहेब भानुदास घाडगे

संबंधित गावाचे सरपंच यांचे नांव व संपर्क :- डॉ. पुण्यवंत आण्णा निमंग्रे

शिबीर कालावधी :- २१.०१.२०१९ ते २७.०१.२०१९

| | |
|---|---|
| प्रथम दिवस | दि. २१ रोजी दुपारी ४.१५ वाजता विशेष श्रमसंस्कार शिबीराचे उदघाटन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. संजय पाटील , तहसिलदार, सांगोला व कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. संतोष राऊत, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सांगोला हे उपस्थित उपस्थित होते. तसेच गांवातील प्रतिष्ठीत नागरिक सरपंच, ग्रामसेवक व ग्रामस्थ यांचा मोठा सहभाग होता. शिबीरार्थी नी ग्रामपंचायत कार्यालय परिसर व स्टेज समोरील स्वच्छता केली. |

| | |
|---|---|
| दुसरा दिवस | दि. २२ रोजी व शिबीर कालावधीमध्ये दररोज सकाळी ५ ते ७ या वेळेत श्री गुरुदत्त विदयालय, वाकी येथील मुख्याध्यापक श्री. आनंदराव मासाळ सर यांनी व्यायाम व योगासने घेऊन शिबीरार्थींच्या मध्ये आवड निर्माण करण्याचा प्रयत्न केला. तसेच सकाळी ८.३० ते १२.३० दरम्यान स्वयंसेवकांनी गावातील मंदिरे उदा. मारुती मंदिर, समाज मंदिर, मायाक्का देवी मंदिर व गांवातील मुख्य रस्ते स्वच्छ करुन सभोवतालची काटेरी झुडपे काढून त्याची योग्य विल्हेवाट लावली. बौध्दविहारासमोर वृक्षारोपणासाठी १० खडडे काढण्यात आले.<br><br>दुपारी ३ ते ५ या वेळात "स्वच्छता ही सेवा" या विषयावर महाविदयालयाचे उपप्राचार्य व अर्थशास्त्र विभागाचे विभागप्रमुख प्रा. संभाजीराव शिंदे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. सायंकाळी ६ वाजता "स्त्री - पुरुष समानता" या विषयावर मनोरंजनातून मार्गदर्शन मा. नंदकुमार मोरे व मा. प्रभा यादव यांनी चित्रफितीच्या माध्यमातून उपस्थित ग्रामस्थांना व स्वयंसेवकांना मार्गदर्शन करुन जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. |
| तिसरा दिवस | दि. २३ रोजी सकाळी स्वयंसेवकांनी श्रमदान मॉंसाहेब दर्गा परिसर व पोस्ट ऑफिस परिसर स्वच्छता व काटेरी झुडपे काढली तसेच अस्ताव्यस्त असलेली दगडे गोळा केली. गांवातील इतर विभागलेल्या रस्त्यांचा परिसर स्वच्छ करुन स्वच्छतेचा संदेश दिला. सदर दिवशी दुपारी ३ वाजता "वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धन काळाजी गरज" याविषयावर महाविदयालयातील भूगोल विभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. रघुनाथ फुले यांनी सर्व शिबीरार्थींना व उपस्थित ग्रामस्थांना उदाहरणे देऊन जागृत करण्याचा प्रयत्न केला. सायंकाळच्या सत्रामध्ये अंधश्रध्दा निर्मूलन व्याख्यान व प्रात्यक्षिक दाखविण्यासाठी प्रा. डॉ. आर. एस. सुर्यवंशी व प्रा. समाधान काटे, श्री. पाटील व अनिस समिती, सांगोला यांनी अंधश्रध्देवरील विविध प्रात्यक्षिक मनोरंजनाच्या माध्यमातून ग्रामस्थांना करुन दाखविली. |

| | |
|---|---|
| चौथा दिवस | दि. २४ रोजी शिबीरार्थींनी वाकी घेरडी गांवातील माध्यमिक विदयालय परिसर स्वच्छता, झाडांना दगडी आळी करणे, काटेरी झुडपे काढून त्याचे विघटन करण्यात आले. तसेच आरोग्य केंद्र परिसर स्वच्छता, प्राथमिक शाळा परिसरातील झुडपे काढून स्वच्छता करण्यात आली. स्मशान भूमी व नगर वाचनालय परिसर स्वच्छता करण्यात आली. दुपारी ३ वाजता "व्यसनाधीनता व आजचा युवक" या विषयावर न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनि. कॉलेजचे प्राध्यापक दिपक खटकाळे यांनी शिबीरार्थींना व ग्रामस्थांना व्यसनाचे दुरुपयोग सांगितले तसेच साय. ६ वाजता मनोरंजनातून मार्गदर्शन याअंतर्गत "सदृढ समाज निर्मितीसाठी विज्ञान व अध्यात्म" या विषयावर ह.भ.प. दत्तात्रय पांचाळ महाराज यांनी उपस्थितांमध्ये विज्ञान व अध्यात्म या विषयी अनेक प्रकारचे वास्तव जीवनातील उदाहरणे देऊन आपण जीवन सुखी व समृध्द जगू शकतो असा आत्मविश्वास निर्माण करुन देण्याचा प्रयत्न केला. |
| पाचवा दिवस | दि. २५ रोजी दत्त मंदिर परिसर स्वच्छता व झाडे लावण्यासाठी ४० खडडे स्वयंसेवकांच्या मदतीने काढण्यात आले तसेच वनराई बंधारा बांधण्याची तयारी करण्यात आली. सदर दिवशी दुपारी "जल व्यवस्थापन व शाश्वत विकास" या विषयावर मार्गदर्शन करणेसाठी महाविदयालयातील मराठी विभागाचे विभागप्रमुख प्रा.डॉ. किसन माने उपस्थित होते. सायंकाळी ६ वाजता "कथाकथन व कविसंमेलन" या विषयाअंतर्गत कवि आबासाहेब शेजाळ गुरुजी व कवि विशाल काटे यांनी सामाजिक, विद्रोही, प्रेम कविता इत्यादी कवितांच्या माध्यमातून समाज प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला. |
| सहावा दिवस | दि. २६ रोजी सकाळी कार्यक्रम अधिकारी व शिबीरार्थीनी गुरुदत्त विदयालयात प्रजासत्ताक दिन साजरा केला तसेच गांवातील गावठाण परिसरात असणा-या ओढयावर बंधारा बांधण्यात आला. बंधा-याची लांबी २० फूट, रुंदी ५ फूट व ऊंची ६ फूट करण्यात आली. दुपारच्या सत्रामध्ये ॲड. राजेश्वरी केदार यांनी "शिक्षण हक्क कायदा जागृती व सायबर क्राइम" या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच गांवातील महिलांसाठी हळदी कुंकवाचा कार्यक्रम आयोजित केला होता. |

| | |
|---|---|
| सातवा दिवस | दि. २७ रोजी दत्त मंदिर परिसरात झाडे लावण्यासाठी खोदण्यात आलेल्या खडडयात झाडे लावण्यात आली. सकाळी ठिक ११.३० वाजता विशेष श्रमसंस्कार शिबीराचा समारोप समारंभाचा कार्यक्रम आयोजित केला होता. सदर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे गांवातील जेष्ठ नागरिक मा. दादासाहेब देवक्ते व कार्यक्रमाचे अध्यक्ष सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, सांगोलाचे चिटणीस मा. श्री. विठठलराव शिंदे, महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. साहेबराव जंदळे व गांवातील ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.<br><br>विशेष श्रमसंस्कार शिबीर यशस्वी करण्यासाठी गावक-यांचा मोठया प्रमाणात सहभाग होता. एकंदरीत नियोजित कार्यक्रमाप्रमाणे विशेष श्रमसंस्कार शिबीर संपन्न झाले. |

वरील नमूद १ ते ७ दिवसांमध्ये महाविदयालयाच्या रासेयो स्वयंसेवकांनी त्यांच्या श्रमदानातून केलेले काम, उपक्रम व त्या कामाचा / उपक्रमाचा अहवाल व महाविदयालयासंबंधीत इतर सहभाग माहिती प्रमाणित करण्यात येत आहे. ( पान क्र. १, २, ३ व ४ )

सही करणार

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
विज्ञान महाविद्यालय, सांगोला

रासेयो कार्यक्रम अधिकारी
सही व शिक्का

प्राचार्य
मा. प्राचार्य सही व शिक्का
विज्ञान महाविद्यालय सांगोला
ता. सांगोला, जि. सोलापूर

सरपंच
मा. सरपंच सही व शिक्का
ग्रामपंचायत वाकी (घेरडी)
ता. सांगो...

मा. संचालक, रासेयो, सही व शिक्का

दि. २१ जाने. रोजी राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या उद्घाटन समारंभाप्रसंगी संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पुजन करताना मान्यवर व गावकरी




उद्घाटन प्रसंगी मा. तहसीलदार संजय पाटील साहेब शिबीरार्थींना मार्गदर्शन करताना.




Kamble
कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
विज्ञान महाविद्यालय,सांगोला

प्राचार्य
विज्ञान महाविद्यालय सांगोला
ता. सांगोला, जि. सोलापूर

उद्घाटन प्रसंगी मा. श्री. संतोष राऊत गटविकास अधिकारी पं.स. सांगोला बोलताना.



शिबीरार्थी दररोज सकाळी ५ ते ७ या वेळात व्यायाम करताना प्रशिक्षक आनंदराव मासाळ सर व शिबीरार्थी



कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
विज्ञान महाविद्यालय, सांगोला

प्राचार्य
विज्ञान महाविद्यालय सांगोला
ता. सांगोला, जि. सोलापूर

शिबीरार्थी व्यायाम करतानाचे छायाचित्र



दि. २२ जाने. रोमी स्वंयसेवक व स्वंयसेविका स्वच्छता करताना (गावातील मुख्य रस्ते, मंदीरे, परिसर)



Kamble.
कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
विज्ञान महाविद्यालय, सांगोला

प्राचार्य
विज्ञान महाविद्यालय सांगोला
ता. सांगोला. जि. सोलापूर

दि. २२ रोजी दुपारी ३ ते ५ या वेळात महाविद्यालयाचे उपप्राचार्य संभाजीराव शिंदे "स्वच्छता हीच सेवा" या विषयावर मार्गदर्शन करताना.



सायंकाळी ६ वाजता "स्त्री-पुरुष समानता" या विषयावर चर्चा करताना मा. नंदकुमार मोरे व मा. प्रभा यादव मॅडम.




Kamble
कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
विज्ञान महाविद्यालय, सांगोला

प्राचार्य
विज्ञान महाविद्यालय सांगोला
ता. सांगोला जि. सोलापूर

दि. 23 रोजी गावातील ~~मंदीर~~ हनुमान मंदीर परिसर

1) स्वच्छता करताना स्वयंसेवक व स्वयंसेविका




2) झुडपे, व यात्रेची जागा स्वच्छ करताना



कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
विज्ञान महाविद्यालय,सांगोला

प्राचार्य
विज्ञान महाविद्यालय सांगोला
ता. सांगोला, जि. सोलापूर

गावातील रस्ते, व स्वच्छतेचा संदेश देताना शिबीरार्थी





कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
...महाविद्यालय, सांगोला

प्राचार्य
विज्ञान महाविद्यालय सांगोला
ता. सांगोला, जि. सोलापूर

दि.२३ जाने. रोजी जलव्यवस्थापन व शाश्वत विकास व वृक्षलागवड व वृक्षसंवर्धन या विषयावर व्याख्यान देताना प्रा.डॉ. फुले रघुनाथ सर व स्वयंसेवक



सायंकाळी अंधश्रध्दा निर्मुलन समीतीचे प्रा. समाधान काटे व टीम यांनी प्रात्यक्षिक करून दाखवताना.




कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
विज्ञान महाविद्यालय, सांगोला

प्राचार्य
विज्ञान महाविद्यालय सांगोला
ता. सांगोला, जि. सोलापूर

दि. २४ रोजी माँ. साहेब दर्गा परिसर, प्राथमिक शाळा, स्मशानभुमी परिसर स्वच्छता करताना शिबीरार्थी





कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
विज्ञान महाविद्यालय, सांगोला

प्राचार्य
विज्ञान महाविद्यालय सांगोला
ता. सांगोला, जि. सोलापूर

प्राथमिक शाळा परिसर स्वच्छता करताना
स्वयंसेवक व स्वयंसेविका





Kenmale
**कार्यक्रम अधिकारी**
**राष्ट्रीय सेवा योजना**
**विज्ञान महाविद्यालय, सांगोला**

Sd/-
**प्राचार्य**
विज्ञान महाविद्यालय सांगोला
ता. सांगोला, जि. सोलापूर

स्मशानभुमी परिसर स्वच्छता व काटेरी झुडपे काढताना - स्वंयसेवक





कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
विज्ञान महाविद्यालय, सांगोला

प्राचार्य
विज्ञान महाविद्यालय सांगोला
ता. सांगोला. जि. सोलापूर

दत्त मंदीर परिसर व राहण्याची व्यवस्था असलेल्या ठिकाणची स्वच्छता करताना स्वंयसेवक व स्वंयसेविका





कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
विज्ञान महाविद्यालय,सांगोला

प्राचार्य
विज्ञान महाविद्यालय सांगोला
ता. सांगोला, जि. सोलापूर

दि.24 रोजी व्यसनाधीनता व आजचा युवक या विषयावर स्वयंसेवकांना व गावकऱ्यांना मार्गदर्शन करताना प्रा.दिपक खटकाळे.




सायंकाळी सदृढ समाज निर्मितीसाठी विज्ञान व आध्यात्म या विषयावर बोलताना श्री पखवाळ सर व गावकरी




कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना

प्राचार्य
विज्ञान महाविद्यालय सांगोला
ता. सांगोला, जि.

स्वंयसेवक सुत्रसंचलन करताना सचिन कोकरे स्वंयसेवक




दि. २४ रोजी गावातील गुरुदत्त विद्यालय परिसर स्वच्छता व झाडांना आळी करताना स्वंयसेवक व स्वंयसेविका



कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
विज्ञान महाविद्यालय, सांगोला

प्राचार्य
विज्ञान महाविद्यालय सांगोला
ता. सांगोला, जि. सोलापूर





Kamble.
**कार्यक्रम अधिकारी**
राष्ट्रीय सेवा योजना
विज्ञान महाविद्यालय,सांगोला

**प्राचार्य**
महाविद्यालय सांगोला
जि. सोलापूर

# गुरुदत्त विद्यालय परिसर स्वच्छता करताना






कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
विज्ञान महाविद्यालय, सांगोला

प्राचार्य
विज्ञान महाविद्यालय सांगोला
ता. सांगोला, जि. सोलापूर

दि. २५ रोजी जलव्यवस्थापन या विषयावर सविस्तर मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. किसन माने




सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री बाळासाहेब शिंदे सर मार्गदर्शन करताना.




कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
विज्ञान महाविद्यालय, सांगोला

प्राचार्य
विज्ञान महाविद्यालय सांगोला
ता. सांगोला, जि. सोलापूर

दि.२६ रोजी ध्वजारोहनासाठी उपस्थित असलेले स्वयसेवक व स्वयसेविका श्री गुरुदत्त विद्यालय वाकी घेरडी येथे.





ध्वजगीत सादर करताना स्वयसेविका श्री गुरुदत्त विद्यालय वाकी घेरडी येथे.



कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
विज्ञान महाविद्यालय,सांगोला

प्राचार्य
विज्ञान महाविद्यालय सांगोला
ता. सांगोला. जि. सोलापूर

वनराई बंधारा बांधण्या पुर्वीचा जागेचा आराखडा आखताना स्वयंसेवक स्वयंसेविका





कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
विज्ञान महाविद्यालय, सांगोला

प्राचार्य
विज्ञान महाविद्यालय सांगोला
ता. सांगोला, जि. सोलापूर

वनराई बंधारा बांधताना स्वयंसेवक व स्वयंसेविका





कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
विज्ञान महाविद्यालय, सांगोला

प्राचार्य
विज्ञान महाविद्यालय सांगोला
ता. सांगोला, जि. सोलापूर

वनराई बंधारा बांधल्यानंतर आनंद साजरा करताना स्वयंसेवक व स्वयंसेविका



~~दुपारच्या~~ दुपारच्या सत्रामध्ये ॲड राजेश्वरी केदार मॅडम स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना.




कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
विज्ञान महाविद्यालय, सांगोला

प्राचार्य
विज्ञान महाविद्यालय सांगोला
ता. सांगोला, जि. सोलापूर

महीला मेळाव्यासाठी आलेल्या महीलांचा ॲड राजेश्वरी मॅडम समवेत फोटो.



श्री दत्त मंदीर परिसर झाडे लावण्यासाठी खोल खड्डे खोदताना स्वंयसेवक



कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना

प्राचार्य
विज्ञान महाविद्यालय सांगोला
ता. सांगोला, जि. सोलापूर

झाडे लावण्यासाठी खड्डे खोदताना स्वयसेवक



दि.२७ समारोप समारंभप्रसंगी आपले मनोगत मांडताना
स्वंयसेवक कोळेकर




कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना

प्राचार्य
विज्ञान महाविद्यालय सांगोला
ता. सांगोला, जि. सोलापूर

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. साहेबराव गुदके समारोप समारंभ प्रसंगी मार्गदर्शन करताना




तसेच संस्थेचे सचीव श्री विठ्ठलरावजी शिंदे सर मार्गदर्शन करताना.




कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
विज्ञान महाविद्यालय, सांगोला

प्राचार्य
विज्ञान महाविद्यालय सांगोला

समारोप समारंभाचे प्रमुख पाहुणे श्री दादासाहेब लेवकते वि स्वंयसेवकांना मार्गदर्शन करताना व उपस्थित गावातील मान्यवर




कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
विज्ञान महाविद्यालय, सांगोला

प्राचार्य
विज्ञान महाविद्यालय सांगोला
ता. सांगोला, जि. सोलापूर





माणदेशाच्या विकासावर दृष्टिक्षेप टाकणारे पुरोगामी विचारसरणीचे एकमेव दैनिक

# माणदूत एक्सप्रेस

email- mandootexpress5@gmail.com सांगोला संपादक-मोहन मस्के मो.९८५०४०३७७३

■ सांगोला, पंढरपूर, मंगळवेढा, माळशिरस, आटपाडी, जत, सोलापूर, सांगली ■

वर्ष-सतरावे अंक -९२ पृष्ठे-०४ मूल्य - १ रुपये रविवार दि २० जानेवारी २०१९ R.N.I. NO. MAHMAR/2002/10619

डॉ.महावीर महादेव आलदर यांचे,

डॉ.आलदर बालरुग्णालय

# सांगोला नगरपालिकेच्या उपनगराध्यक्षपदी स्वाती मगर यांची निवड

सांगोला (प्रतिनिधी):-सांगोला नगरपालिकेच्या उपनगराध्यक्षपदी शेतकरी कामगार पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व काँग्रेस आय यांच्या नगरविकास आघाडीच्या स्वाती राजू मगर यांची निवड करण्यात आली. निवडीनंतर आघाडीच्या कार्यकर्त्यांनी गुलालाची मुक्त उधळण, फटाक्यांची आतिषबाजी करीत त्यांची सवाद्य मिरवणूक काढली. यावेळी आ.गणपतराव देशमुख यांनी नूतन उपनगराध्यक्षा स्वाती मगर यांचा पुष्पहार घालून सत्कार केला.

सांगोला नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यानी एक वर्षाचा कार्यकाल संपल्याने पदाचा राजीनामा दिला होता. काल शनिवार १९ रोजी नगराध्यक्षा तथा पीठासीन अधिकारी राणीताई माने यांच्या अध्यक्षतेखाली उपनगराध्यक्ष पदासाठी निवडणूक घेण्यात आली.

यावेळी उपनगराध्यक्ष पदासाठी नगरविकास आघाडीकडून स्वाती मगर तर महायुतीकडून छाया मेटकरी यांचे अर्ज दाखल करण्यात आले. दोन्हीही अर्ज छाननीत वैध ठरल्याने हात वर करून घेण्यात आलेल्या मतदानात नगरविकास आघाडीच्या स्वाती मगर यांना १२ तर महायुतीच्या छाया मेटकरी यांना ७ मते मिळाली. पीठासीन अधिकारी तथा नगराध्यक्षा राणीताई माने यांनी स्वाती मगर यांची उपनगराध्यक्षपदी निवड झाल्याचे जाहीर केले.



यावेळी मुख्याधिकारी प्रज्ञा पोतदार-पवार, गटनेते सचिन लोखंडे, गटनेते आनंदा माने, नगरसेवक चेतनसिंह केदार, सतिश सावंत, आस्मीर तांबोळी, प्रशांत धनवजीर, गजानन बनकर, जुबेर मुजावर, सुरेश माळी, रफिक तांबोळी, ज्ञानेश्वर तेली, नगरसेविका भामाबाई जाधव, अनुराधा खडतरे, पुजा पाटील, शोभा घोंगडे, छाया मेटकरी, अप्सरा ठोकळे, सुनिता खडतरे उपस्थित होते.

निवडीनंतर महायुती व आघाडीकडून नूतन उपनगराध्यक्षा स्वाती मगर यांचा सत्कार करण्यात आला.

आता नगरपालिकेत मुख्याधिकारी प्रज्ञा पोतदार, नगराध्यक्षा राणीताई माने आणि उपनगराध्यक्षा स्वाती मगर यामुळे नगरपालिकेत महिलाराज आल्याची शहरवासियांतून चर्चा होत आहे.

**सांगोला नगरपरिषदेच्या निवडणुकीनंतर उपनगराध्यक्ष पदासाठी पहिल्या वर्षासाठी सुरेश माळी, दुसऱ्या वर्षी चेतनसिंह केदार आणि आता तृतीय वर्षासाठी स्वाती मगर यांना संधी मिळाली आहे. महिला व बालकल्याण समितीच्या सभापती स्वाती मगर यांनी नगरपरिषद हद्दीत राबविलेले उपक्रम व विविध योजनांचा लाभार्थ्यांना मिळवून दिलेला निधी याची पोचपावती म्हणून त्यांना उपनगराध्यक्षपदाची संधी मिळाली आहे.**

## विविध शालेय उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळाले-प्रा.एस.के.पाटील

### सांगोला कन्या प्रशालेत पारितोषिक वितरण समारंभ



सांगोला(प्रतिनिधी):- विद्यार्थीदशेत विद्यार्थ्यांनी स्वतः बदलले पाहिजे. प्रशालेत दररोज नवनवीन ज्ञान आत्मसात करावे. त्याचा विद्यार्थ्यांनी परिपूर्ण, पुरेपूर फायदा घ्यावा. कन्या प्रशालेतील विविध उपक्रमांमुळेच विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळाल्याचे सांगितले. जो विद्यार्थी शालेय जीवनात प्रचंड मेहनत घेतो तो कधीही अयशस्वी होत नाही. त्याकरिता विद्यार्थ्यांनी सकारात्मक एक पाऊल पुढे टाकावे. याकरिता ही संस्था राबवीत असलेली उपक्रम निश्चितच कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गार सिंहगड बी.एड.कॉलेजचे प्राचार्य एस.के. पाटील यांनी यावेळी केले. ते सांगोला येथील कन्या प्रशालेने आयोजित केलेल्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या पारितोषिक वितरण समारंभावेळी बोलत होते.

सुरुवातीस संस्थापक कै.वामनराव शिंदे, सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले व द्विपप्रज्वलनाने करण्यात आली. गुरुवारी विद्यार्थी शिक्षक दिन व फनफेअर कार्यक्रम तसेच शुक्रवारी शेलापागोटे व सांस्कृतिक कलाविष्कार कार्यक्रमाने रंगत आणली.

यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे इनरव्हीलच्या अध्यक्षा मंगल लाटणे, सचिव अश्विनी कांबळे, स्वातंत्र्य सैनिक मोहिते सर, संस्थाध्यक्षा श्रीमती कौशल्यादेवी शिंदे, सचिव निलकंठ शिंदे सर, प्रमिला जगदाळे, विद्यार्थी प्रतिनिधी कु.सौरभ उबाळे, महविश शेख, उपस्थित होते. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ या कालावधीत घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ वरील मान्यवरांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

प्रास्ताविक मुख्याध्यापिका सुवर्णप्रभा घोरपडे तर सुत्रसंचलन सुवर्णा इंगवले मॅडम यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

## दिपक शिंदे यांच्या वाढदिवसा निमित्त रक्तदान शिबिर संपन्न

सांगोला(प्रतिनिधी):- संगेवाडी येथील ओंकार दुध संस्थेचे चेअरमन दिपक(भाऊ)शिंदे यांच्या वाढदिवसा निमित्त काल शनिवार दि.१९ जानेवारी रोजी ग्रामपंचायत कार्यालय येथे रक्तदान शिबिर आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात १०६ रक्तदात्यांनी रक्तदान केले. गेल्या चार वर्षापासून वाढदिवसा निमित्त रक्तदान शिबिर आयोजित केले जात आहे.



या रक्तदान शिबिराचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते मोठ्या उत्साही वातावरणात करण्यात आले. सदर रक्तदान शिबिरामध्ये रक्तदात्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यामध्ये महिलांनी सुध्दा रक्तदान केले. रक्तदान शिबिरामध्ये रक्त संकलन पंढरपूर येथील पंढरपूर रक्तपेढी पंढरपूर यांनी केले. वाढदिवसा निमित्त रक्तदान शिबिर आयोजित केल्याबद्दल दिपक (भाऊ) शिंदे यांचे संगेवाडी व परिसरातून कौतुक होत आहे.

## श्री विश्वकर्मा पांचाळ सुवर्णकार बहुउद्देशिय संस्थेचा उद्घाटन कार्यक्रम संपन्न



श्री.शैलेंद वेदपाठक श्री.अविनाश क्षीरसागर श्री.प्रकाश पंडित श्री.ईश्वर तरकसबंद श्री.व्यंकटेश दिक्षित श्री.महादेवपंडित सचिन क्षीरसागर संतोष महामुनी



बजरंग क्षीरसागर अनिल क्षीरसागर आनंद दिक्षित

सांगोला(प्रतिनिधी): श्री विश्वकर्मा पांचाळ सुवर्णकार बहुउद्देशिय संस्था रजि.नं.महा/५८१/२०१८ दि.२७/१२/२०१८ या संस्थेचे उद्घाटन मोठ्या थाटामाटात संपन्न झाले.

प्रास्ताविकमध्ये श्री.प्रकाश पंडित यांनी संस्था नोंदणी करण्यामागील हेतू हा समाजातील तळागाळातील सुवर्णकार समाजाचा सर्वांगीण विकास करुन समाज संघटन करणे, समाजोपयोगी सामुदायिक कार्यक्रम राबविणे, याकरिता समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले.

रखमाई चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव श्री जनार्धन पंडित यांनी नोंदणीकृत संस्थेच्या माध्यमातून अनेक समाजोपयोगी, सामुदायिक कार्यक्रम राबविता येतात असे सांगून अनेक विषयांवरती मार्गदर्शन केले. जेष्ठ सल्लागार डॉ.वल्लभ कस्तुरे, प्रा.श्रीनिवास कस्तुरे सर, प्रा.महामुनी सर, प्रा.वेदपाठक सर, श्री.बजरंग क्षीरसागर, अविनाश क्षीरसागर, प्रकाश पंडित, बाळासाो पंडित, मिलिंद कस्तुरे, दिक्षित सर, मधुकर तरकसबंद, सचिन क्षीरसागर, अक्षय महामुनी, यांनी विचार व्यक्त करुन संस्थेस शुभेच्छा दिल्या. संस्थेचे अध्यक्ष श्री.शैलेंद्र वेदपाठक यांनी संस्था स्थापनेमागील हेतू विशद करुन सर्वांना बरोबर घेवून सर्वांच्या सहकार्याने आपण अनेक चांगले कार्यक्रम हाती घेवून संस्थेचे नाव उज्ज्वल करु अशी ग्वाही दिली.

श्री.महेंद्र वेदपाठक यांनी आभार मानले. कार्यक्रमास सांगोला तालुका व शहरामधील जेष्ठ नागरिक व समाजबांधव बहुसंख्येने उपस्थित होते.

संस्थेचे संचालक मंडळ पुढीलप्रमाणे :- अध्यक्ष श्री.शैलेंद मधुकर वेदपाठक, उपाध्यक्ष श्री.अविनाश कमलाकर क्षीरसागर, सचिव श्री.प्रकाश भागवत पंडित, सहसचिव श्री.ईश्वर यशवंत तरकसबंद, खजिनदार श्री.व्यंकटेश दत्तात्रय दिक्षित, सदस्य श्री.महादेव पांडुरंग पंडित, सदस्य सचिन सुभाष क्षीरसागर, सदस्य संतोष अशोक महामुनी, सदस्य बजरंग प्रभाकर क्षीरसागर, सदस्य अनिल सुभाष क्षीरसागर, सदस्य आनंद नारायण दिक्षित.

## विज्ञान महाविद्यालयच्या राष्ट्रीय सेवा योजना कॅम्पचे वाकी घेरडी येथे आयोजन

सांगोला (प्रतिनिधी):- विज्ञान महाविद्यालय सांगोला यांच्या वतीने आयोजित केलेल्या राष्ट्रीय सेवा योजना कॅम्पचे वाकी(घे.) ता- सांगोला येथे सोमवार दि.२१ जानेवारी ते रविवार दि.२७ जानेवारी या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रम सोलापूर विद्यापीठ सोलापूर व विज्ञान महाविद्यालय सांगोला यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केला असून राष्ट्रीय सेवा योजना यांच्या वतीने विशेष श्रमसंस्कार शिबीर २०१८-१९ अंतर्गत वृक्षारोपन व वृक्षसंवर्धन, जलव्यवस्थापनासाठी युवक, स्वच्छ भारत अभियान या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन सोमवार दि.२१ जानेवारीला सायंकाळी ४ वा कार्यक्रमाचे उद्घाटक जि.प सदस्या श्रीमती स्वातीताई कांबळे, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व सांगोला तहसीलचे तहसीलदार श्री संजय पाटील, कार्यक्रमाचे अध्यक्ष व सांगोला पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री.संतोष राऊत, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ साहेबराव गुरुळे, संस्थेचे सचिव श्री.विठ्ठलराव शिंदे व अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.

मंगळवार दि.२२ जानेवारी रोजी सकाळच्या सत्रात श्रमदानाचे काम व दुपारी ३ ते ५ या सत्रात स्वच्छता हीच सेवा या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे व संध्याकाळच्या सत्रात सायंकाळी ६ ते ९ या वेळेत स्त्री पुरुष समानता हा प्रबोधनपर उपक्रम संपन्न होणार आहे.

बुधवार दि.२३ जानेवारी रोजी सकाळच्या सत्रात श्रमदान व दुपारच्या सत्रात ३ ते ५ या वेळेत वृक्षलागवड व वृक्षसंवर्धन काळाची गरज या विषयावर व्याख्यान होणार आहे व संध्याकाळच्या सत्रात सायंकाळी ६ ते ९ या वेळेत अंधश्रद्धा निर्मूलन व्याख्यान व प्रात्यक्षिक हा प्रबोधनपर उपक्रम संपन्न होणार आहे.

गुरुवार दि.२४ जानेवारी रोजी सकाळच्या सत्रात श्रमदान व दुपारच्या सत्रात ३ ते ५ या वेळेत व्यसनाधीनता व आजचा युवक या विषयावर व्याख्यान होणार आहे व संध्याकाळच्या सत्रात सायंकाळी ६ ते ९ या वेळेत सदृढ समाज निर्मितीसाठी विज्ञान व अध्यात्म हा प्रबोधनपर उपक्रम संपन्न होणार आहे.

शुक्रवार दि.२५ जानेवारी रोजी सकाळच्या सत्रात श्रमदान व दुपारच्या सत्रात ३ ते ५ या वेळेत जलव्यवस्थापन व [illegible] विषयावर व्याख्यान होणार आहे व संध्याकाळच्या सत्रात सायंकाळी ६ ते ९ या वेळेत कथा कथन व कवी संमेलन हा प्रबोधनपर उपक्रम संपन्न होणार आहे.

शनिवार दि.२६ जानेवारी रोजी सकाळच्या सत्रात श्रमदान व दुपारच्या सत्रात ३ ते ५ या वेळेत शिक्षण हक्क कायदा जागृती या विषयावर व्याख्यान होणार आहे व संध्याकाळच्या सत्रात सायंकाळी ६ ते ९ या वेळेत सांस्कृतिक कार्यक्रम हा उपक्रम संपन्न होणार आहे.

रविवार दि.२७ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता कार्यक्रमाचा समारोप समारंभ संपन्न होणार असून त्यासाठी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सांगोला पंचायत समितीचे सभापती सौ [illegible], कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे सचिव श्री.विठ्ठलराव शिंदे, प्रमुख उपस्थिती म्हणून संस्था उपाध्यक्ष श्री [illegible], संस्था [illegible] महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ [illegible] उपस्थित राहणार आहेत.

[illegible]

पान ३ वर

## सह्याद्री इंग्लिश मिडीअमचे इलिमेंटरी व इंटरमेजिएट परिक्षेत यश



सांगोला (प्रतिनिधी):- सन २०१८-१९ मध्ये घेण्यात आलेल्या इलिमेंटरी व इंटरमेजिएट परिक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. [illegible] निकाल १००% लागला. [illegible] इलिमेंटरीचा निकाल [illegible] लागला. [illegible] शिक्षिका सौ.मनिषा [illegible] यांचे मार्गदर्शन लाभले. [illegible] व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थाध्यक्ष डॉ दिलीपकुमार इंगवले, व्यवस्थापिका सौ अविना इंगवले, मार्गदर्शिका सौ शिंग मॅडम व मुख्याध्यापिका सौ प्रमोदिनी जाधव मॅडम यांनी कौतुक केले.

प्राचार्य
विज्ञान महाविद्यालय सांगोला
ता. सांगोला, जि. सोलापूर

प्लॉट विकणे आहेत.

हेमत मुसरीफ पुणे.

आमचा बदलेला पत्ता अथर्व एंटरप्रायजेस

# विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना कॅम्पचे आयोजन

सांगोला (जगन्नाथ साठे): विज्ञान महाविद्यालय सांगोला यांच्या वतीने आयोजित केलेल्या राष्ट्रीय सेवा योजना कॅम्पचे वाकी(घे.) ता.सांगोला येथे दि-२१जानेवारी ते २७जानेवारी या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रम सोलापूर विद्यापीठ सोलापूर व विज्ञान महाविद्यालय सांगोला यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केला असून राष्ट्रीय सेवा योजना यांच्या वतीने विशेष श्रमसंस्कार शिबीर २०१८-१९ अंतर्गत वृक्षारोपन व वृक्षसंवर्धन,जलव्यवस्थापनासाठी युवक,स्वच्छ भारत अभियान या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. सदर कार्यक्रमाचे उदघाटन सोमवार दि-२१ जानेवारीला सायंकाळी ४ वाजता कार्यक्रमाचे उदघाटक व जि.प सदस्या श्रीमती स्वातीताई कांबळे, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व सांगोला तहसीलचे तहसीलदार संजय पाटील, कार्यक्रमाचे अध्यक्ष व सांगोला पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संतोष राऊत, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. साहेबराव जुंदळे, संस्थेचे सचिव विठ्ठलराव शिंदे व अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.

मंगळवार दि- २२ जानेवारी रोजी सकाळच्या सत्रात श्रमदानाचे काम व दुपारी ३ ते ५ या सत्रात स्वच्छता हीच सेवा या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे व संध्यकाळच्या सत्रात सायंकाळी ६ ते ९ या वेळेत स्त्री पुरुष समानता हा प्रबोधनपर उपक्रम संपन्न होणार आहे. बुधवार दि-२३ जानेवारी रोजी सकाळच्या सत्रात श्रमदान व दुपारच्या सत्रात ३ ते ५ या वेळेत वृक्षलागवड व वृक्षसंवर्धन काळाची गरज या विषयावर व्याख्यान होणार आहे व संध्यकाळच्या सत्रात सायंकाळी ६ ते ९ या वेळेत अंधश्रद्धा निर्मूलन व्याख्यान व प्रात्यक्षिक हा प्रबोधनपर उपक्रम संपन्न होणार आहे.

गुरुवार दि-२४ जानेवारी रोजी सकाळच्या सत्रात श्रमदान व दुपारच्या सत्रात ३ ते ५ या वेळेत व्यसनाधीनता व आजचा युवक या विषयावर व्याख्यान होणार आहे व संध्यकाळच्या सत्रात सायंकाळी ६ ते ९ या वेळेत सदृढ समाज निर्मितीसाठी विज्ञान व अध्यात्म हा प्रबोधनपर उपक्रम संपन्न होणार आहे. शुक्रवार दि-२५ जानेवारी रोजी सकाळच्या सत्रात श्रमदान व दुपारच्या सत्रात ३ ते ५ या वेळेत जलव्यवस्थापन व शाश्वत विकास या विषयावर व्याख्यान होणार आहे व संध्यकाळच्या सत्रात सायंकाळी ६ ते ९ या वेळेत कथा कथन व कवी संमेलन हा प्रबोधनपर उपक्रम संपन्न होणार आहे. शनिवार दि-२६ जानेवारी रोजी सकाळच्या सत्रात श्रमदान व दुपारच्या सत्रात ३ ते ५ या वेळेत शिक्षण हक्क कायदा जागृती या विषयावर व्याख्यान होणार आहे व संध्यकाळच्या सत्रात सायंकाळी ६ ते ९ या वेळेत सांस्कृतिक कार्यक्रम हा उपक्रम संपन्न होणार आहे. रविवार दि-२७ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता कार्यक्रमाचा समारोप समारंभ संपन्न होणार असून त्यासाठी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सांगोला पंचायत समितीचे सभापती सौ श्रुतिका लवटे, कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे सचिव विठ्ठलराव शिंदे, प्रमुख उपस्थिती म्हणून संस्था उपाध्यक्ष रामचंद्र खटकाळे , संस्था सचालक नारायणराव भगरे , महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. साहेबराव जुंदळे व अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

सदर शिबारामध्ये ग्रामस्वच्छता अभियान, जलसंवर्धन , वृक्षारोपन , माती व पाणी परीक्षणाचे महत्व , सामाजिक वनीकरण जागृती , हागणदारीमुक्त गाव योजना हे प्रकल्प राबविण्यात येणार आहेत. या शिबिरासाठी सदिच्छा भेट म्हणून सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस, सोलापूर विद्यापीठाचे समन्वयक डॉ. धोकटे एम. एस., जिल्हा समन्वयक मा. डॉ. नवराज काळदाते, विभागीय समन्वयक डॉ. चंद्रकांत काळे, संस्था उपाध्यक्ष रामचंद्र खटकाळे, संस्था सदस्य नारायणराव भगरे , संस्था सदस्य बबनराव जानकर, सांगोला पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राजकुमार केंद्रे, सांगोला नगरपालिकेच्या मुख्याधिकारी सौ. प्रज्ञा पोतदार व अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

सदर कार्यक्रमाचे कार्यक्रम अधिकारी म्हणून प्रा. अशोक कांबळे व प्रा. डॉ. काकासाहेब घाडगे हे काम पाहणार आहेत. तर सहा. कार्यक्रम अधिकारी म्हणून प्रा. गडहिरे रावसाहेब, प्रा. आदलिंगे नारायण , प्रा. बाळासाहेब सरगर आणि सहा.महिला कार्यक्रम अधिकारी म्हणून प्रा. सौ. सीमा गायकवाड व प्रा सौ. अश्विनी मिसाळ व मदतनीस म्हणून वसंत गुसाळे हे काम पाहणार आहेत.

# श्रमसंस्कार शिबीरातून मिळते सेवेतून समाज जोडण्याची मानसिकता : स.पो.नि. भुजबळ

अकलूज (विलास गायकवाड): राष्ट्रीय सेवा योजना शिबीरांमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये सकारात्मक बदल घडतो. सेवेतून समाज जोडण्याची मानसिकता त्यांच्यामध्ये निर्माण होत असल्याचे मत सहाय्यक पोलीस निरिक्षक राजकुमार भुजबळ यांनी व्यक्त केले. शिक्षण प्रसारक मंडळ संचलीत रत्नाई कृषी महाविद्यालय, अकलूज यांच्या वतीने लोंढे-मोहितेवाडी (ता. माळशिरस) येथे राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत विशेष श्रमसंस्कार शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.



या शिबीराचे उद्घाटन प्रसंगी स.पो.नि. भुजबळ बोलत होते. यावेळी पं. स. सदस्य मानसिंग मोहिते, वसंत जाधव, सुरेश मोहिते, अजिनाथ रूपनवर, संजय मोहिते, अशोक लवटे, सचिन जाधव, सरपंच सदाशिव ननवरे, बाळासाहेब गाडे ग्रामसेवक सदाशिव भंडलकर, मुख्याध्यापक भागवत निंबाळकर, प्राचार्य डॉ. डी. पी. कोरटकर उपस्थित होते. या शिबीरामध्ये विद्यार्थी ग्रामस्वच्छता, शोषखडे, काटेरी बाभळींचे निर्मूलन, ओढ्यावर बंधारा बांधणे, सांडपाणी व्यवस्थापन आदी कामे करणार आहे. त्याचबरोबर विद्यार्थी व ग्रामस्थांसाठी विविध महत्वपुर्ण विषयांवर व्याख्यानांचेही आयोजन करण्यात आल्याची माहिती कार्यक्रम अधिकारी प्रा. सचिन एकतपुरे यांनी दिली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहा. कार्यक्रम अधिकारी प्रा. धोंडीराम साळुखे यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील, सचिव अभिजित रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे यांचे मार्गदर्शन लाभले. सुत्रसंचालन स्वयसेवक संग्राम पाटील, ऋतुजा पलंगे यांनी तर आभार शबाना शेख यांनी व्यक्त केले.

## ई रेडिमिक्स प्लास्टर निर्मिती प्रकल्पाचे उद्घाटन

सोलापूर (प्रतिनिधी): वाळूला पर्याय म्हणून सुदीप ... वाळूपेक्षा कमी किमतीत ई-रेडिमिक्स प्लास्टर उपलब्ध ... याची गुणवत्ता उत्तम

## मनपाच्यावतीने महाराणा प्रतापसिंह यांना अभिवादन

यमाई

चार धाम यात्रा
* तुळजापूर * पंढरपूर
* गंगणापूर *
अक्कलकोट
मो.८८८८८८३६७९
९७३०२६९३९३

श्री विठ्ठल कंस्ट्रक्शन
आमच्याकडे जे.सी.बी, पोकलेन, ट्रक्टर, भाड्याने मिळेल व विहिरींची कामे करुन मिळतील.
प्रोप्रा.प्रमोद डोंगरे
मो.७८७५२४०१०१,
८३९०५८१२८३

शर्मा
टिंट स
* सात रस्ता सोलापूर
फोन नं.०२१७-२६०५०९१ *
प्रभात टॉकी जवळ सोलापूर.
फोन ०२१७-७४९६००

नव्याने घेऊन येत आहेत.
जर्मन भाषेचे क्लासेस
पहिल्यांदाच आपल्या
सोलापूर मध्ये...
स्वरांजली
ओव्हरसिज
पत्ता : प्लॉट नंबर २१४,
पतंजली मेगा स्टोरच्या
मागे,भारती विद्यापिठ रोड-
जुळे सोलापूर
संपर्क:- ८३२९१८५१५७

फक्त महिलांसाठी.. महिलांकरीता..
महिला संचलित..
तनया कलेक्शन
* ब्रॅन्डेड होजिअरी जॉकी, बॉडी केअर, कल्याणी * गाऊन्स * ड्रेस मटेरियल * लेगिन्स * शॉर्ट टॉप * कुर्ता * जिन्स * जेगिंज * टि-शर्ट * ज्वेलरी
फोन : ०२१७-२६०६०६१
३६, पहिला महिला, टंगसाळ शॉपिंग सेंटर, आसरा, होटगी रोड, सोलापूर

भाकरी फॅक्टरी
आमच्याकडे ज्वारीची, बाजारीची भाकरी व शेंगा चटणी ठोक व किरकोळ भावात मिळेल.
मो.९८५०८४८३५४,८६५७८८७००६

न्यू भारत फॅशन
शुटींग, शर्टींग, लेडीज टॉप, ड्रेस मेटेरिअल, कुर्तीज, लेगीजसह सर्व प्रकारचे ड्रेसेस् एकाच छत्ता खाली मिळण्याचे एकमेळव ठिकाण.
मो.९९७०७७७४२१
१३, आनंद नगर, इंदिरा नगर, रोड, विजापूर रोड, सोलापूर.

अल्बा
टाईम्स & ऑप्टिकल्स
शास्त्रोक्त चष्मे व फॅन्सी गॉगल, तसेच घड्याळ विक्री व दुरुस्ती केले जातील.
शॉप नं.१, स्क्वेअर-वन कॉम्प्लेक्स,१३१ सिध्देश्वरपेठ, सिव्हिल पेठ, सिव्हिल कोर्टा समोर सोलापूर
मो.९८२२७८२५२२

जागा विकणे
मुरारजी पेठेतील, अरविंद धाम वसाहतीच्या बाजूच्या यश नगरातील, बांधकाम परवानगी मंजूर असलेला १८२० चौ.फुटाचा खुला प्लॉट अर्जंट विकणे आहे.
हर्ट ऑफ सिटी, डफरिन चौकात, पहिल्या मजल्यावरील, ५४० चौ.फुटाचा १बीएचके फ्लॅट अर्जंट विकणे आहे.
नविन आरटीओ ऑफिसच्या पुढे, जाई-जुई नगरातील, बांधकाम परवानगी मंजूर असलेला १६४० चौ.फुटाचा व १०३३ चौ.फुटाचा खुला प्लॉट अर्जंट विकणे आहे.
संपर्क : स्वत:मालक प्रताप सुर्यवंशी, ९४२३०६५३१२

भारतात प्रथमच MLM मध्ये
सुवर्णसंधी
१००% गुणवताची हमी ५ वर्षे ग्राहकांची आपार मागणी ISO मानाकींत कंपनीची हॉलमार्क असलेले एक तालुका, एक डिलर, एक गाव, एक डिस्ट्रीब्युटर या तत्वावर कंपनीचे डिलर, डिस्ट्रीब्युटर्स व वितरक नेमणे आहे.
: संपर्क :
८२०८९४१७३२

श्री स्वामी समर्थ
ग्रंथ भांडार

... प्लॉट विकणे आहेत.

हेमंत मुसरीफ पुणे.

कॉल करा :- ९५४५००९५३५, ९१२२८३४५४५.

## विज्ञान महाविद्यालयच्या राष्ट्रीय सेवा योजना कॅम्पचे वाकी(घे.) येथे आयोजन .

सांगोला/प्रतिनिधी- विज्ञान महाविद्यालय सांगोला यांच्या वतीने आयोजित केलेल्या राष्ट्रीय सेवा योजना कॅम्पचे वाकी(घे.) ता-सांगोला येथे दि-२१जानेवारी ते २७जानेवारी या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे सदर कार्यक्रम सोलापूर विद्यापीठ सोलापूर व विज्ञान महाविद्यालय सांगोला यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केला असून राष्ट्रीय सेवा योजना यांच्या वतीने विशेष श्रमसंस्कार शिबीर २०१८-१९ अंतर्गत "वृक्षारोपन व वृक्षसंवर्धन,जलव्यवस्थापनासाठी युवक,स्वच्छ भारत अभियान" या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. सदर कार्यक्रमाचे उदघाटन सोमवार दि-२१ जानेवारीला सायंकाळी ४ वाजता कार्यक्रमाचे उदघाटक व जि.प सदस्या श्रीमती स्वातीताई कांबळे, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व सांगोला तहसीलचे तहसीलदार मा. श्री संजय पाटील, कार्यक्रमाचे अध्यक्ष व सांगोला पंचायत समितीचे गटविकास अधिकारी मा.श्री. संतोष राऊत, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. साहेबराव जुंदळे, संस्थेचे सचिव मा. श्री. विठ्ठलराव शिंदे व अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.

मंगळवार दि- २२ जानेवारी रोजी सकाळच्या सत्रात श्रमदानाचे काम व दुपारी ३ ते ५ या सत्रात "स्वच्छता हीच सेवा" या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे व संध्यकाळच्या सत्रात सायंकाळी ६ ते ९ या वेळेत "स्त्री पुरुष समानता" हा प्रबोधनपर उपक्रम संपन्न होणार आहे. बुधवार दि-२३ जानेवारी रोजी सकाळच्या सत्रात श्रमदान व दुपारच्या सत्रात ३ ते ५ या वेळेत "वृक्षलागवड व वृक्षसंवर्धन काळाची गरज" या विषयावर व्याख्यान होणार आहे व संध्यकाळच्या सत्रात सायंकाळी ६ ते ९ या वेळेत "अंधश्रद्धा निर्मूलन [illegible]" हा प्रबोधनपर उपक्रम संपन्न होणार आहे. गुरुवार दि-२४ जानेवारी रोजी सकाळच्या सत्रात श्रमदान व दुपारच्या सत्रात ३ ते ५ या वेळेत "व्यसनाधीनता व आजचा युवक" या विषयावर व्याख्यान होणार आहे व संध्यकाळच्या सत्रात सायंकाळी ६ ते ९ या वेळेत "सदृढ समाज निर्मितीसाठी विज्ञान व अध्यात्म" हा प्रबोधनपर उपक्रम संपन्न होणार आहे. शुक्रवार दि-२५ जानेवारी रोजी सकाळच्या सत्रात श्रमदान व दुपारच्या सत्रात ३ ते ५ या वेळेत "जलव्यवस्थापन व शाश्वत विकास" या विषयावर व्याख्यान होणार आहे व संध्यकाळच्या सत्रात सायंकाळी ६ ते ९ या वेळेत "कथा कथन व कवी संमेलन" हा प्रबोधनपर उपक्रम संपन्न होणार आहे. शनिवार दि-२६ जानेवारी रोजी सकाळच्या सत्रात श्रमदान व दुपारच्या सत्रात ३ ते ५ या वेळेत "शिक्षण हक्क कायदा जागृती" या विषयावर व्याख्यान होणार आहे व संध्यकाळच्या सत्रात सायंकाळी ६ ते ९ या वेळेत "सांस्कृतिक कार्यक्रम" हा उपक्रम संपन्न होणार आहे. रविवार दि-२७ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता कार्यक्रमाचा समारोप समारंभ संपन्न होणार असून त्यासाठी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सांगोला पंचायत समितीचे सभापती मा. सौ श्रुतिका लवटे, कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे सचिव मा. श्री विठ्ठलराव शिंदे, प्रमुख उपस्थिती म्हणून संस्था उपाध्यक्ष मा. श्री. रामचंद्र खटकाळे , संस्था संचालक मा. श्री. नारायणराव भगरे , महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. साहेबराव जुंदळे व अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

[illegible] ग्रामस्वच्छता अभियान, जलसंवर्धन , वृक्षारोपन , माती व पाणी परीक्षणाचे महत्व , सामाजिक वनीकरण जागृती , हागणदारीमुक्त गाव योजना हे प्रकल्प राबविण्यात येणार आहेत. या शिबिरासाठी सदिच्छा भेट म्हणून सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. मृणालिनी फडणवीस, सोलापूर विद्यापीठाचे समन्वयक मा.डॉ. धोकटे एम. एस., जिल्हा समन्वयक मा. डॉ. नवराज काळदाते, विभागीय समन्वयक मा. डॉ. चंद्रकांत काळे, संस्था उपाध्यक्ष मा. श्री रामचंद्र खटकाळे, संस्था सदस्य नारायणराव भगरे , संस्था सदस्य बबनराव जानकर, सांगोला पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मा. श्री. राजकुमार केंद्रे, सांगोला नगरपालिकेच्या मुख्याधिकारी मा.सौ. प्रज्ञा पोतदार व अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

सदर कार्यक्रमाचे कार्यक्रम अधिकारी म्हणून प्रा. अशोक कांबळे व प्रा. डॉ. काकासाहेब घाडगे हे काम पाहणार आहेत. तर सहा. कार्यक्रम अधिकारी म्हणून प्रा. गडहिरे रावसाहेब, प्रा. आदलिंगे नारायण , प्रा. बाळासाहेब सरगर आणि सहा.महिला कार्यक्रम अधिकारी म्हणून प्रा. सौ. सीमा गायकवाड व प्रा सौ. अश्विनी मिसाळ व मदतनीस म्हणून मा. श्री वसंत गुसाळे हे काम पाहणार आहेत.

## सुधीर गुंड यांची प्राथमिक शिक्षक संघाच्या कार्याध्यक्षपदी निवड .

श्रीपुर प्रतिनिधी - माढा तालुक्यातील विठ्ठलवाडी येथील रहिवासी व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मोडनिंब येथे सहशिक्षक म्हणून कार्यरत असणारे सुधीर बाळू गुंड यांची माढा तालुका प्राथमिक शिक्षक संघाच्या कार्याध्यक्षपदी सर्वानुमते दिनांक 19 जानेवारी रोजी बिनविरोध निवड करण्यात आली आहे.



सुधीर गुंड यांनी प्राथमिक शिक्षक संघाची ध्येयधोरणे व कामकाज शिक्षकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत याचीच दखल घेत संघाच्या कार्यकारिणीच्या बैठकीत सर्वानुमते त्यांची निवड करून तालुकास्तरीय पद देऊन त्यांचा सत्कार व सन्मान करण्यात आला आहे. यापूर्वीही तालुका पातळीवरील विठ्ठलराव शिंदे प्राथमिक शिक्षक पतसंस्थेचे संचालक म्हणून त्यांनी 10 वर्षे अत्यंत उत्कृष्ट पद्धतीने कामकाज केले आहे. विठ्ठलवाडीचे सेवानिवृत्त आदर्श मुख्याध्यापक बाळू गुंड यांचे सुपूत्र व आदर्श शिक्षक राजेंद्र गुंड यांचे कनिष्ठ बंधू आहेत.

निवडीनंतर बोलताना नूतन कार्याध्यक्ष सुधीर गुंड म्हणाले की, शिक्षकांचे प्रश्न व समस्या सोडवण्यासाठी तसेच शालेय विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी सर्वांना सोबत घेऊन संघाच्या माध्यमातून विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम राबविणार आहे.

या निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन जिल्हा परिषद सदस्य रणजितसिंह शिंदे,जिल्हाध्यक्ष शिवानंद भरले,कार्याध्यक्ष लिंबराज जाधव, तालुकाध्यक्ष भाऊराव शिंदे, ज्ञानेश्वर चट्टे, विस्ताराधिकारी विकास यादव, बंडू शिंदे, सरपंच बालाजी गव्हाणे,उपशाखाप्रमुख मोहन कदम,चेअरमन अनिलकुमार अनभुले पोलिस उपअधीक्षक सचिन कदम,मेजर एकनाथ वागज,अशोक चव्हाण, तंटामुक्ती अध्यक्ष अरुण मोरे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डा. मोहन शेगर,वाचनालयाचे अध्यक्ष रामचंद्र भांगे,सौदागर गव्हाणे, नेताजी उबाळे,धनाजी सस्ते, प्रा.डा. नेताजी कोकाटे, राजाभाऊ कदम, विष्णू शेंडगे, सोमनाथ खरात, गणेश गुंड ,समाधान कोकाटे, दिनेश गुंड, सज्जन मुळे, गोरख शेगर, सुरेश मुळे, सतीश गुंड, सौदागर खरात, भिवाजी जाधव, कैलास सस्ते यांच्यासह शिक्षक व संघाच्या पदाधिका-यांनी केले आहे.

**********************

## अदिती किड्स शाळेचे ऑलिम्पियाड परीक्षेत यश.

परतूर: प्रतिनिधी येथील अदिती किड्स इंग्रजी शाळेचे नुकत्याच झालेल्या नॅशनल ऑलिम्पियाड स्पर्धा परीक्षेत 14 मुलांनी घवघवीत यश मिळविले यात अदिती प्रशांत [illegible] गुणापैकी 37 अंक घेत झोनल पुरस्कार पटकावले [illegible] शालेय गोल्ड मेडल मिळविले.



शाळेच्या प्रतीक्षा दुगाने, सोनल अंभुरे, दिव्या पवाडे यांची द्वितीय चाळणी परीक्षेत निवड झाली. इयत्ता 3 रीत श्रावणी कागणे, वशराज अंभुरे, साक्षी सोळंके, प्रथमेश पिसाळ झोनल पुरस्कार पटकावला व दुसऱ्या फेरी साठी पात्र ठरले. इयत्ता 2 री तून अजय बागल, वैष्णवी सोळंके यांनी गोल्ड मेडल पटकावले तर विराट कानगे व गौरव धोरात यांनी सिल्व्हर मेडल पटकावले. शाळेच्या वतीने संस्था अध्यक्षा डॉ. सौ. छाया अंभुरे व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले.

*******


# चलो सांगोला ! चलो सांगोला ! चलो सांगोला !

**दिनांक २१ जानेवारी २०१९ रोजी सकाळी ११-०० वा.**

मौजे ता. सांगोला येथील इटकी, कटफळ, खवासपूर, लोटेवाडी (नवी-जुनी) अचकदाणी, लक्ष्मीनगर, बागलवाडी, सोनलवाडी, चिकमहुद, बंडगरवाडी, नरळेवाडी (वाकी)व त्या अंतर्गत येणाऱ्या वाड्यावस्त्या मिळुन १३ गावांचा येणाऱ्या २०१९ मधील लोकसभा, विधानसभा व इतर निवडणुकांच्या मतदानावर

# * सामुहिक बहिष्कार *

१५ ऑगस्ट १९४७ ला भारत देश स्वतंत्र झाला परंतु आम्हाला काय मिळाले? आजही आम्हाला अन्न, वस्त्र निवारा व पाणी, शिक्षण या मुलभुत गरजासाठी झगडावे लागत आहे. शेजारील माण, खटाव, आटपाडी, जत व सांगोल्याचा बराचसा भाग या भागात टेंबू, उरमोडी, म्हैसाळचे पाणी आलेले आहे. सर्वत्र सुजलाम सुफलाम होत होत आहे. तरीच आम्हाला जाणीव पुर्वक पाण्यापासून वंचीत ठेवण्यात आलेले आहे. आमची गावे पर्जन्य छायेच्या प्रदेशात येतात. वर्षानुवर्षे गावात दुष्काळ आहे. शेती ओस झालेली आहेत. लोकांच्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन शेती व पशुपालन होते परंतु सततच्या दुष्काळामुळे, शेतकरी मजुर कष्टकरी यांना उदरनिर्वाहासाठी स्थलांतरीत होण्याची वेळ आली आहे. गावातील लोक ऊसतोडी, हमाली तसेच इतर कामासाठी परगावी गेले आहेत. त्यामुळे त्यांच्या रोजगारासाठी आज येथे तर उद्या तेथे जावे लागत आहे. आमची मुले शिक्षणापासून वंचीत राहु लागली आहेत. शिक्षणाचा दर्जाही खालावल्याने राहणीमान निकृष्ठ दर्जाचे झाले आहे. आजचे युवक ही उद्याची भावी पिढी तीच कमजोर होत चालली आहे.

म्हणून १३ गावात शेतीसाठी ठोस पाणी पुरवठा योजना द्यावी व त्याची कार्यवाही त्वरीत व्हावी यासाठी खालील योजनात आमच्या १३ गावांचा समावेश करावा.

१) उरमोडीच्या पाण्यामध्ये राजेवाडीचा समावेश करावा, २) जिहे-काथापूर मध्ये १३ गावांचा समावेश करावा.


## हार्ड वर्क बरोबरच स्मार्ट वर्कची गरज - पोलीस उपअधिक्षक डॉ. सागर कवडे

पंढरपूर/प्रतिनिधी

'शालेय जीवनापासूनच पोलीस अधिकारी होण्याचे मनोमन ठरविले आणि त्या ध्येयानुसार कठोर परिश्रम सुरु केले आणि माझ्या प्रयत्नांना फळ मिळाले आणि इच्छित ध्येय गाठू शकलो. मित्रांनो, सुरवातीला वैद्यकीय क्षेत्रात संधी आणि पुढे पोलीस खात्यात मिळालेली संधी पहिली असता असे सांगावेसे वाटते की, कोणतेही काम सहज सोपे होत नसते. त्यासाठी कोणत्याही प्रसंगी आपला आत्मविश्वास ढळू न देता 'कठोर परिश्रमा'बरोबरच'स्मार्ट वर्क' केले तर अवघड काम सहज सोपे करू शकतो हे सिद्ध होते.' असे प्रतिपादन पंढरपूर उपविभागीय पोलीस अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक डॉ. सागर कवडे यांनी केले. येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अॅण्ड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित पदवी अभियांत्रिकी



हाम्पे म्हणाले की, 'कोणतेही काम लहान नसून ते पूर्ण करण्यासाठी मेहनत ही घ्यावीच लागते. स्वेरीचे सचिव व प्राचार्य डॉ. रोंगे सरांनी त्यावेळी घालून दिलेल्या 'हार्ड वर्क'च्या सवयीमुळे मला अशक्य असे काहीच जाणवले नाही आणि अवघड कार्य देखील सहज होऊ लागले. ज्यांचे स्वप्न भक्कम आहेत त्यांनी त्याचा पाठपुरावा करून यशाचे ध्येय गाठावे.'असे आवाहन केले. पुढे बोलताना डी.वाय.एस.पी. डॉ. कवडे म्हणाले की, 'आयुष्याच्या प्रत्येक क्षेत्रात आपला आत्मविश्वास कमी होऊ देवू नका. पुढील आयुष्याचे नियोजन [illegible]

